कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/रा.म.भ स्प./२०२३–२४/१६१
दि. ०८/०८/ २०२३

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित पं.मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती महिला कलाकारांच्या राज्यस्तरीय भजन स्पर्धा रविवार दि १३ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी २.३० वाजता साखळी येथील रविंद्र भवनच्या पं. मनोहरबुवा शिरगांवकर साभागृहात आयोजित करण्यात आली आहे.

तत्पुर्वी सकाळी ९.३० वाजता बाल कलाकारांची राज्यस्तरीय भजन स्पर्धा होणार असून स्पर्धेचा सविस्तर कार्यक्रम मागाहून जाहिर करण्यात येईल.

दि १५ ऑगस्ट २०२३ रोजी पुरुष कलाकार भजन स्पर्धेला जोडून सायंकाळी बाल महिला व परुष कलाकारांच्या विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

**स्पर्धांचा सविस्तर कार्यक्रम खाली देण्यात आला आहे.**

**महिला कलाकार**

विद्यावर्धक मंडळ, डिचोली, श्री सातेरी केळबाय बारावंश महिला भजनी मंडळ, मोर्ले–सत्तरी, श्री शिव समर्थ सांस्कृतिक मंडळ, वास्को, श्री रामनाथ दामोदर भजनी पथक, चिखली, श्री शांतादुर्गा सांखळयो महिला भजनी मंडळ पांचमी, खांडेपार–फोंडा, श्री बेताळदेव महिला भजनी मंडळ, तामसुली, खांडोळा–फोंडा, शिवप्रसाद सातेरी महिला भजनी मंडळ, तुये–पेडणे व श्री नागेश महारुद्र भजनी मंडळ, कुडका–तिसवाडी या पथकांचा समावेश आहे.

सदर राज्यस्तरीय स्पर्धांच्या आयोजनासाठी रविंद्र भवन, साखळी यांचे सक्रिय सहकार्य लाभले आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होणा-या सर्व पथकांनी आपल्या स्पर्धेच्या दिवशी सादरीकरणाच्या किमान १ तास अगोदर पुर्वतयारीसह उपस्थित राहाणे आवश्यक असून स्पर्धेचा अनुक्रम चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल व तो सर्वांवर बंधनकारक राहील. सादरीकरणाचा अनुक्रम न पाळणा-या पथकांना भजन सादर करु दिले जाणार नाही व सदर पथक स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल याची सर्व पथकांनी नोंद घ्यावी. तरी भजनप्रेमी रसिकांनी राज्यस्तरीय भजन स्पर्धेला मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति

१. गोमंतक २. नवप्रभा ३. तरुण भारत ४. पुढारी ५. लोकमत

६. दै. हेराल्ड ७. गोवनवार्ता ८. आकाशवाणी पणजी केंद्र ९. दै. भांगरभूंय

एसझेड/एसएस